# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## कुलसचिव कार्यालय

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५

जाहिरात क्र. -४१/२०२१ दि.१६/१२/२०२१

### जाहिरात

### थेट मुलाखत (WALK IN INTERVIEW)

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे एक महिला व एक पुरूष डॉक्टरची विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी पॅनलवर १ वर्षाकरीता मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. आवश्यक शैक्षणिक अर्हता पुर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक व अनुभव संबंधीत दस्ताऐवजासह **दि.२९/१२/२०२१** रोजी सकाळी ११.०० वाजता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे मुलाखती (WALK IN INTERVIEW) करीता उपस्थित राहावे.

| पदनाम | पदांची संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी (मानधन तत्वावर) | पुरूष १<br>महिला १ | उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा MBBS/ BAMS समकक्ष पदवी धारक व भारतीय वैद्यकीय परिषद तर्फे नोंदणीकृत असावा. |

वैद्यकीय अधिकारी पॅनलवर नियुक्तीबाबत अधिक माहिती करीता विद्यापीठाच्या **www.unigug.ac.in** चे अवलोकन करावे.

स्वा/-
(डॉ. अनिल चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**वैद्यकीय अधिकारी पॅनलवर १ पुरूष व १ महिला डॉक्टरची नियुक्ती करण्याबाबत आवश्यक शैक्षणिक अर्हता व सर्वसाधारण सुचना खालीलप्रमाणे.**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा MBBS/BAMS समकक्ष पदवी धारक व भारतीय वैद्यकीय परिषद तर्फे नोंदणीकृत असावा.

२) वैद्यकीय अधिकारी पॅनलवर **१ पुरूष** व **१ महिला** डॉक्टराची नियुक्ती करण्यात येणार आहे.

३) वैद्यकीय अधिकारी पॅनलवरील नियुक्त करण्यात येणाऱ्या डॉक्टराचे **मानधन** हे शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या आधारे वाटाघाटीद्वारे ठरविण्यात येईल.

४) वैद्यकीय अधिकारी पॅनलवरील नियुक्ती ०१ वर्षाच्या कालावधीकरीता असेल. तद्नंतर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

५) नियुक्ती कालावधीत नियुक्ती ठिकाणी सोपविलेले काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत अधिकाऱ्यांची राहिल.

६) उमेदवार हा शारिरीक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा झालेला नसावा.

७) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधीत अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकिय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारास अपात्र समजले जाईल.

८) मुलाखतीस येणाऱ्या इच्छुक अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

९) विद्यापीठ प्रशासनाव्दारे आयोजित मुलाखतीस पाचारण करण्यात येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरीता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१०) निवड प्रक्रिया सूरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती उपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

११) वैद्यकीय अधिकारी पॅनलवर नियुक्त उमेदवारांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील कायम सेवेकरीता हक्क सांगता येणार नाही.

दिनांक :- / /२०२१
ठिकाण :- गडचिरोली.

16.12.2021

(डॉ. अनिल चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली